पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०

◉ परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation ◉

जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/ 658
Ref. No. : PAHSU/BOEE/

दिनांक :
Date : 21 JUN 2022

# परिपत्रक क्रमांक- 23

**सदर्भ :- प्रस्तुत विद्यापीठाचे पत्र क्र.पुअहोसेविसो/पवमूमं विभाग/पेपर सेटींग/२०२२/५९०, दि २४ मे,२०२२**

प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य / विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलाचे संचालक यांना कळविणेत येते की, संदर्भात नमूद केलेल्या पत्राच्या अनुषंगाने Question Bank Soft Copy तयार करुन विद्यापीठाच्या ई-मेलवर पाठविण्याच्या सूचना मा प्राचार्य/संचालक, सर्व विद्याशाखेचे अधिष्ठाता, सर्व अभ्यासमंडळाचे अध्यक्ष आणि सर्व प्राश्निक यांना देण्यात आल्या होत्या. संदर्भिय पत्रामध्ये वर नमूद केलेल्या सर्व सन्मानीयांना सर्व विषयाचे Question Bank तयार करण्यासंदर्भात सर्व प्राश्निक यांना आवश्यक त्या सूचना व मार्गदर्शन आपल्या स्तरावरुन करुन यासंदर्भात त्वरीत कार्यवाही करुन विद्यापीठास सहकार्य करण्याबाबत विनंती देखील करण्यात आली होती

शासनाने मार्च/एप्रिल २०२२ च्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना Question Bank पुरविण्याबाबत सर्व विद्यापीठाना कळविले आहे. त्यानुसार Question Bank च्या संदर्भात प्रस्तुत विद्यापीठाकडून दिनांक २३/५/२०२२ रोजी मा कुलगुरु महोदया यांच्या अध्यक्षतेखाली मा अधिष्ठाता व मा अभ्यासमंडळे यांचे अध्यक्ष यांची ऑनलाईन बैठक आयोजित केलेली होती. सदर बैठकीमध्ये सर्वानुमते झालेल्या निर्णयानुसार संबंधित सर्व प्राचार्य /संचालक मा अधिष्ठाता, अभ्यासमंडळे अध्यक्ष व सर्व प्राश्निक यांनी Question Bank तयार करुन दिनांक ३०/५/२०२२ रोजीपर्यंत ई-मेलवर पाठवून देण्याबाबत कळविले होते.

वरीलप्रमाणे झालेल्या निर्णयानुसार Question Bank चे मानधन किती देण्यात यावे. याबाबतचा निर्णय घेण्यात आला नव्हता. सदरचा विषय समोर आल्यानंतर सदरील बाबीची टिपणी सन्मानीय कुलगुरु महोदयांच्या आदेशार्थ सादर केली असता खालीलप्रमाणे मानधन देण्याबाबतचा निर्णय सन्मानीय कुलगुरु महोदयांनी घेतला आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| **४० गुणाचा Question Bank सेट (UG/PG एका सेमिस्टरला एका विषयास)** | **रु.१०००/-** | **८० गुणाचा Question Bank सेट ( UG/PG एका सेमिस्टरला एका विषयास )** | **रु १५००/-** |

वरीलप्रमाणे Question Bank सेटनुसार मानधनास मंजूरी देण्यात आली असून सदरच्या सर्व UG/PG एका सेमिस्टरला एका विषयास त्याचप्रमाणे गुणनिहाय सेट करिता नमूद केल्याप्रमाणे मानधन मंजूर करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे, यांची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

(डॉ शिवकुमार गणपूर )
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रति,

१) प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य/ प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलाचे संचालक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर / सर्व विद्याशाखेचे अधिष्ठाता,/अभ्यासमंडळेचे अध्यक्ष प्रस्तुत विद्यापीठ, सोलापूर